**नियमीत दिवाणी दावा क्र. १८/२०१६**
**(दादु मोहिते वि. शौकत लोहार)**
**(CNR No.MHSN12000059-2016)**

**<u>निशाणी क्र. ६९, ६९, ७१ खालील आदेश</u>**

प्रस्तुतचा अर्ज वादीचे वारस यांनी वादीचे विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश सेटअसाईड होवून मिळणेकरिता, वारस रेकॉर्डवर घेणेस झालेला विलंब माफ होवून मिळणेबाबत आणि वारस रेकॉर्डवर घेणेकरिता अर्ज दाखल केलेला आहे.

२. वादीने त्यांच्या अर्जात असे कथन केले आहे की,वादी दादू कृष्णा मोहिते हे दि. २६/०२/२०२० रोजी मयत झाले आहेत. तथापि, वादी दादू कृष्णा मोहिते यांचे कायदेशिर व सरळ वारस रेकॉर्डवरती आणणेसाठी वादी यांना विलंब झालेला आहे. सदरचा दावा कायद्यास अभिप्रेत असलेल्या मुदतीत वारस रेकॉर्डवरती न आणलेले वादी यांचे विरुध्दचा दावा अबेटमेंटचा हुकूम झालेला आहे. सदरचा विलंब हा वादी यांनी जाणुनबुजून व हेतुपुरस्कररित्या केलेला नाही. म्हणून वादीने वारस रेकॉर्डवर घेणेस झालेला विलंब माफ होवून अबेटमेंटचा आदेश सेटअसाईड होवून वादी दादू कृष्णा मोहिते चे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी विनंती केली आहे.

३. प्रस्तुत अर्जास प्रतिवादी यांनी आपले म्हणणे दिले असून सदरचा अर्जातील मजकूर त्यांना मान्य व कबूल नसल्याचे व सदरचा वादी यांचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. अर्ज वाचला. अभिलेख पाहिला.

५. प्रस्तुत वादी यांनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादींविरुध्द अतिक्रमित जमीनीचा कब्जा मिळणेसाठी दाखल केला आहे. वादी दादू कृष्णा मोहिते हे दि. २६/०२/२०२० रोजी मयत झाले आहेत. वादी दादू कृष्णा मोहिते यांचे वारस अभिलेखावर घेतल्यास प्रतिवादी यांचे काही एक नुकसान होणार नाही. याउलट विलंब माफ न झाल्यास वादी यांचे पैशाने कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. मुळ दाव्याचे स्वरुप पाहता वादी दादू कृष्णा मोहिते यांचे वारस

अभिलेखावर घेणेस आवश्यक आहे. म्हणून वादी यांचा नि. ६८ कडील अर्ज विलंब माफीचा अर्ज मंजूर करुन प्रतिवादी विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश सेटअसाईड करुन नि. ७१ प्रमाणे नमुद वारसांना याकामी अभिलेखात सामील करणेत येत आहे. सबब, या निष्कर्षास अनुसरुन मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

**:: आदेश ::**

१. वादी यांचा नि.६८, ६९ व ७१ कडील अर्ज मंजूर करण्यात येते.

२. वादी यांनी नि. ६८, ६९ व ७१ कडील अर्ज दंड रक्कम रु.३००/– प्रतिवादी यांना देणेच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

३. दंड रक्कम भरलेनंतर वादी यांनी वादी यांचे वारस अभिलेखात सामील करुन तशी दुरुस्ती दाव्यात करावी व दुरुस्त दाव्याची प्रत पुढील तारखेपर्यंत दाखल करावी.

SHAIKH MOHAMMED AAMER

Digitally signed by SHAIKH MOHAMMED AAMER
Date: 2025.08.14 17:33:41 +0530

**पलूस.** **(एम.ए.एम.जे. शेख)**

**दि. १४.०८.२०२५** **दिवाणी न्यायाधीश क. स्तर, पलूस.**

## CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Sou. Jyoti A. Salunkhe (Grade-3) |
| Court | : | M.A.M.J. Shaikh, Civil Judge Junior Division & Judicial Magistrate First Class, Palus, Dist. Sangli. |
| Date | : | 14/08/2025 |
| Order signed by the Presiding officer on | : | 14/08/2025 |
| Order uploaded on | : | 14/08/2025 |